# एन्. दत्ता - भाग २



आता आपण ’मि. एक्स’साठी (१९५७) त्यांनी बांधलेली गाणी पाहूया. विशेष करून ’लाल लाल गाल, जान पे है लागू’ हे अकॉर्डिअन, सॅक्सोफोन आणि ड्रम्स यांचा उपयोग करून रॉक ऍण्ड रोल पध्दतीचे रफीने गायलेलेल गाणे प्रचंड लोकप्रिय झाले. स्वप्नात घडल्यासारखे आशा भोसले यांचे ’कितना हसी है ये समा’ हे गाणे, गायकी आणि गोड आवाजामुळे अद्‌भुत वाटते. ’सदके तेरी चाल के कजरा वजरा डालके...आनेवाली आना कभी, यारोंकी गली’ (रफी-गीता) यांनी गायलेलेल हे युगुलगीत तर अफलातूनच आहे.

१९५८ साली बी. आर्. फिल्म्सचा ’साधना’ हा चित्रपट प्रदर्शित झाला आणि एन्. दत्ता यांच्या डोक्यावर मानाचा शिरपेच चढला. आणि का नाही चढणार ? ह्या चित्रपटातील साहिरच्या गाण्यावर दिलेला संगीतसाज इतका लाजवाब आहे की पुढील गाण्यावरूनच तुमच्या ते लक्षात येईल. उत्कृष्ट तबल्याच्या साथीने लताने म्हटलेले ’कहो जी तुम क्या क्या खरीदोगे ?’ हे सुरेल गीत तर रफी आणि एस्. बलबीर यांनी गायलेली ’आज क्यू हमसे परदा है’ ही मनोहर कव्वाली, गीता दत्तचे ’तेरा मनवा क्यू घबराये रे’ हे मदहोष गाणे, आशा आणि रफी यांचे सुरेख तालावरील ’सम्भल ऐ दिल, तडपने और तडपानेसे क्या होगा’ हे व्हायोलिनच्या उठावदार तुकड्यासह सादर केलेले गीत आणि रसिकांना कायम आवडलेले ’औरतने जनम दिया मर्दोंको, मर्दोंने उसे बाजार दिया’ हे लताने गायलेले आर्त गीत - एकंदरीता ’साधना’ चित्रपटाने एन्. दत्ता यांची कारकीर्द समृध्द केली.

ह्याच वर्षी साहिर-एन्. दत्ता या जोडगोळीच्या ’लाईट हाऊस’ ह्या चित्रपटातील आशा भोसले यांनी व्याकुळतेने गायलेल्या ’तंग आ चुके है कश्मकश-ए-जिंदगी से हम’ या गाण्याने अक्षरश: जादू केली.

१९६९च्या ’भाई बेहन’ ह्या चित्रपटात ह्याच संगीतकाराचे साधे, सुबोध आणि गोड चालीचे ’सारे

जहाँसे अच्छा हिंदोस्ता हमारा’ हे गाणे आशा भोसले यांनी कोरसच्या साथीने गायले आहे. जी. पी. सिप्पी यांच्या ’ब्लॅक कॅट’ मध्ये ’मै तुम्हीसे ये पूँछती हूँ, मुझे तुमसे प्यार क्यू है?’ हे गाणे दि ग्रेट लताच्या आवाजात सादर केले आहे. (इथे पुन्हा एन्. दत्ता यांनी पेश केलेल्या अकॉर्डिअनच्या सुरेल हिंदोळ्याची रंगत काही औरच आहे.) ’सितारे राह तकते है, चले आओ, चले आओ’ हे लताचे त्याच चित्रपटातील आणखी एक गाणेही श्रवणीय आहे.

बी. आर्. चोप्रा यांनी आणखी एक संगीतप्रधान असा भन्नाट चित्रपट सादर केला. तो म्हणजे ’धूल का फूल’ (१९५९). इथेही साहिरच्या साथीने एन्. दत्ता यांनी यशाची नवनवीन शिखरे पादाक्रांत केली. त्या गाण्यांची एक झलक पाहूया - ’तेरे प्यार का आसरा चाहता हूँ’ (महेंद्र-लता), ’धडकने लगे दिल के तारोंकी दुनिया, जो तुम मुस्करा दो’ (महेंद्र आणि आशा - अकॉर्डिअनच्या मस्त तुकड्यासह आणि कडव्यांतील तालांची वैविधता संभाळून म्हटलेले गाणे) ही गाणी लोकांच्या पसंतीस उतरली यात नवल काय ? वाऱ्याच्या झुळुकीसारखे ’झुकती घटा, गाती हवा सपने जगाये’ हे आशाचे व पुढील अर्ध्या गाण्यात महेंद्रची ’रवाँ है छोटीसी कश्ती’ ह्या पंक्तीची साथ असलेले गाणे, महेंद्रच्या गाण्याला आशाने प्रणयभावनेने दिलेली आलापीची साथ तुम्हाला धुंद करून टाकते. एन्. दत्तांची ही किमया अवर्णनीय नाही का ?) परंतु ’धूल का फूल’ मध्ये ’दामनमे दाग लगा बैठे’ हे शहनाईच्या दमदार साथीने म्हटलेले तारसप्तकातील गाणे मनाचा ठाव घेते. तसेच ’तू हिंदू बनेगा ना मुसलमान बनेगा, इन्सानकी औलाद है इन्सान बनेगा’ हे त्यांचेच गाणे अगदी तोडीस तोड असे आहे. ह्या गाण्यांतील सतार आणि शहनाईचे उत्कृष्ट तुकडे तर ग्रेटच आहेत, परंतु साहिरच्या शब्दांतच खरे सौंदर्य आहे. ’तू मेरे प्यार का फूल है’ हे लताचे गाणे, तर नंतरचे सुधा मल्होत्राचे ’कासे कहूँ मनकी बात’ हे सुरेल गीत ! ’धूल का फूल’ ची सर्वच गाणी एखाद्या रसिक संग्राहकासाठी मौल्यवान खजिनाच आहे. ह्या चित्रपटाचे संगीत करताना हा संगीतकार जणू काही ईश्वरी कृपेच्या छायेखाली होता असेच वाटते !

’जालसाझ’ १९५९ मध्ये प्रदर्शित झाला. त्यामधेही उत्तम गाणी होतीचा आणि तुम्हाला आठवत असेल तर ’ अ रा रा रा - तोडो ना दिल बेकरार का’ हे किशोर आणि आशा यांनी गायलेले खोडकर गाणे एन्. दत्ता यांनी किशोरच्या धर्तीने नाविन्यपूर्णतेने सादर केले. तसे पाहिले तर एन्. दत्तांच्या स्टाईलचा हा आणखी नवा अवतार वाटतो.

(क्रमश:)

**- माणेक प्रेमचंद**

('Yesterday's Melodies Today's Memories' या पुस्तकातून.)

**NOTE:** Among the many things India can be proud about is the wonderful music that was made in the Hindi cinema of yesteryear. Songs that touched (and still

touch) the hearts of many millions of people who understand Hindustani. No matter where we were, inside or outside the country, and whether we were old or young, rich or poor, fat or thin, there were songs that kept us enjoying them. Or making life more bearable, at the least. “Yesterday's Melodies Today's Memories” is a biographical salute to all the main singers, composers, and songwriters who put out these melodies, from the start in 1931, till about 1970.

Manek Premchand's second book was “Musical Moments From Hindi Films”, which celebrated 75 years of sound (and music) in Hindi Films. The author next wrote another music book called “Romancing The Song”, which traces the history and changing face of lyrics in Hindi Cinema, right from 1931 till now.

After that, he wrote a third of the biography of the santoor maestro Pandit Shiv Kumar Sharma, outlining in some details the great musician’s role in Hindi cinema, both as an instrumentalist and a composer.

His latest book “Talat Mahmood, The Velvet Voice” was released in May 2015.
To buy his books, or otherwise write to the author, his email address is manekpremchand@gmail.com